**दि. २१ नोव्हेंबर, २०२४**
**वृत्त क्र. १७१**

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण; मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज

मुंबई, दि. २१ : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक -२०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढले असून, सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील ६१.१% वरुन यावेळी अंदाजे ६६% पर्यंत मतदानाचे प्रमाण पोहोचले आहे. (पोस्टल मतांचा समावेश वगळता). मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखालील भारत निवडणूक आयोगाने नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रक्रियांचे सखोल विश्लेषण करण्यात आलेले आहे. यानुसार अनेक उपक्रम राबविण्यात आले, ज्यांची काटेकोर अंमलबजावणी राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी दिसून आली.

मतदार यादी पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांत दुसरी विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरिक्षण मोहीम राबविण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीनंतर मतदार यादी सतत अद्ययावत करत असताना या पुनरिक्षणामुळे ४० लाख नवीन मतदारांची भर पडली, ज्यामध्ये १८-१९ वयोगटातील मतदारांचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त होते. तृतीयपंथीय, विशेषत: असुरक्षित आदिवासी जमाती समूह (PVTGs) आणि दिव्यांग मतदारांना मतदार यादीत समाविष्ट करण्यावर विशेष लक्ष दिले गेले.
मतदारांना सुविधा मिळाव्यात यासाठी मतदान केंद्रांवर विशेष भर देण्यात आला. मतदान केंद्रांचे पुनर्रचना, गटातील केंद्रीकरण कमी करणे, तात्पुरत्या ठिकाणांवरून कायमस्वरूपी इमारतींमध्ये मतदान केंद्र हलविणे, गरजेनुसार नवीन मतदान केंद्र स्थापन करणे, तसेच उंच इमारतींमध्ये, गृहसंकुलांमध्ये आणि झोपडपट्टीत मतदान केंद्र उभारणे यासारखे उपक्रम राबविण्यात आले.

मतदान केंद्रातील मतदारांची संख्या मर्यादित ठेवण्याच्या उद्देशाने मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करुन नवीन मतदान केंद्र निर्माण करण्यात आली. ५८०० हून अधिक ठिकाणी गटातील केंद्रीकरण कमी करण्यात आले; ११०० हून अधिक मतदान केंद्र उंच इमारती आणि गृहसंकुलांमध्ये उभारण्यात आली; तर २०० हून अधिक मतदान केंद्र झोपडपट्ट्यांमध्ये स्थापन करण्यात आली.

प्रत्येक मतदाराला आपले मतदान केंद्र ओळखणे सोपे जावे यासाठी -आपले मतदान केंद्र जाणून घ्या’ मोहिम राबविण्यात आली. तसेच, जवळजवळ सर्व मतदारांना मतदार माहिती चिठ्ठया वितरित करण्यात आल्या. मुंबईत, एकाच ठिकाणी अनेक मतदान केंद्र असल्यास त्यांना वेगळया रंगाच्या कोड देण्यात आला, आणि हा रंग कोड मतदार माहिती चिठ्ठीतही छापण्यात आले, ज्यामुळे मतदारांना आपले मतदान केंद्र ओळखणे सुलभ झाले.

प्रत्येक मतदान केंद्रावर किमान आश्वासित सुविधा जसे पिण्याचे पाणी, रॅम्प, रांगेत बसण्याची सोय, पार्किंग सुविधा आदींवर निवडणूक आयोगाने विशेष लक्ष दिले. ग्रामीण व शहरी स्थानिक संस्थांनी या सुविधा पुरविण्यात यश मिळवले, ज्याचे सर्व मतदारांनी राज्यभर कौतुक केले.

मतदारांसोबत योग्य वर्तन ठेवण्यासाठी मतदान अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले. लोकसभा निवडणुकीत एका वेळी एका व्यक्तीला मतदान केंद्रात सोडण्याच्या नियमाऐवजी, या वेळी एकाच वेळी चार व्यक्तींना प्रवेश देण्यात आला. मतदार ओळख, शाई लावणे आणि मतदान हे तीनही टप्पे एकाच वेळी विविध मतदारांकरिता पूर्ण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक (NSS) व एन.सी.सी. कॅडेट्सनी (NCC) रांगा व वाहतूक व्यवस्थापनात मदत केली, तसेच वयोवृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींनाही सहाय्य केले.

मुंबई ही राज्याचे राजधानी शहर असल्याने, तसेच जागतिक स्तरावर मोठे व महत्त्वाचे शहरी केंद्र असल्याने, लोकसभा निवडणुकीत दिसलेल्या काही आव्हानांचा अभ्यास करून आणि सध्याच्या प्रशासकीय परिस्थितीचा सखोल आढावा घेतल्यानंतर, निवडणूक आयोगाने मुंबई शहर व उपनगर या दोन्ही जिल्ह्यांसाठी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. याशिवाय, अतिरिक्त महापालिका आयुक्तांना सहायक जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नेमण्यात आले आणि प्रत्येक अधिकाऱ्याला एका संसदीय मतदारसंघाची (सहा विधानसभा मतदारसंघ) जबाबदारी देण्यात आली. उपक्रम यशस्वी झाला व त्याचा फायदाही लगेच दिसून आलेला आहे.

आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यासाठी महसूल, पोलीस आणि इतर निवडणुकीशी संबंधित विभागातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. कायदा आणि सुव्यवस्थेशी संबंधित आव्हाने हाताळताना क्षेत्रीय यंत्रणा नेहमीच सतर्क राहिली.

## मतमोजणी व्यवस्था

२८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २८८ मतमोजणी केंद्रे आणि १६-नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी ०१ मतमोजणी केंद्र स्थापन करण्यात आले आहे. २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २८८ मतमोजणी निरीक्षक आणि १६-नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी ०२ मतमोजणी निरीक्षक नेमले गेले आहेत.

२३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता सर्व मतमोजणी केंद्रांवर मतमोजणी सुरू होईल. या प्रक्रियेदरम्यान, पोस्टल मतपत्रिकांची मतमोजणी सकाळी ८:०० वाजता सुरू होईल, त्यानंतर ईव्हीएमवरील मतांची मोजणी सकाळी ८:३० वाजता सुरू होईल.

मतमोजणी केंद्रांच्या प्रस्तावास निवडणूक आयोगाने मंजुरी दिली असून सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याबाबत व्यापक प्रसिद्धी दिली आहे. निवडणूक लढविणारा उमेदवार/राजकीय पक्षांना मतमोजणी केंद्रांच्या ठिकाणाबाबत लेखी स्वरूपात कळविण्यात आले आहे. निरीक्षक व उपस्थित उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समोर सीलबंद स्ट्रॉंग रूम्स उघडण्यात येतील व ईव्हीएम मतमोजणी केंद्रावर नेण्यात येतील. मतमोजणी केंद्रातील सर्व कार्यवाही सी.सी. टीव्हीद्वारे चित्रित केली जाईल. तीन- स्तरीय सुरक्षा व्यवस्था निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लागू करण्यात आली आहे.

सध्याच्या निवडणुकीत प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एनआयसी (NIC) च्या मदतीने फॉर्म १२ आणि १२-डी त्वरित हस्तांतरित करण्यासाठी ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आली. मंजूर फॉर्मसाठी रिकाम्या पोस्टल मतपत्रिकांची देवाण-घेवाण तसेच मतदान केलेल्या मतपत्रिकांच्या विनिमयासाठी जिल्हा, विभागीय, आणि राज्य स्तरावर समन्वय केंद्रे कार्यरत करण्यात आली. ८५+ वयाच्या ६८,००० हून अधिक ज्येष्ठ नागरिक आणि १२,००० पेक्षा अधिक दिव्यांग व्यक्तींनी गृह मतदानाचा लाभ घेतला. ३६,००० हून अधिक अत्यावश्यक सेवा मतदारांनी पोस्टल मतपत्रिकांद्वारे मतदान केले आणि ४,६६,८२३ पोस्टल मतपत्रिका निवडणूक कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आल्या.

सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये टपाल मतपत्रिकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे २८८ मतमोजणी केंद्रांवर १७३२ टेबल्स टपाल मतपत्रिकांच्या मतमोजणीसाठी आणि ५९२ टेबल्स इटीपीबीएमएस (ETPBMS) स्कॅनिंगसाठी (पूर्व-मोजणीसाठी) उभारण्यात आले आहेत.

मतमोजणी प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी सतत माध्यमांसमोर माहिती सादर करण्यात आली आहे आणि महत्त्वाचे आकडेवारी व घडामोडी ऑनलाइन व पारंपरिक माध्यमांद्वारे प्रसारित करण्यात आली आहे.

0000

# Press Note: 21.11.2024

Maharashtra State Assembly Elections 2024 witnessed increased in voting per centage from 61.1 per cent in 2019 Assembly Elections to approximate around 66 per cent excluding Postal Ballots. Election Commission led by Sh. Rajiv Kumar has undertaken a deeper analysis of the process of recently concluded elections to the Lok Sabha. Various activities were planned whose meticulous implementation is evident on the day of poll on 20th November 2024 for Assembly Elections.

Second Special Summary Survey Revision was taken up in the months of August and September. This revision, in conjunction with continuous updation of electoral rolls since the completion of Lok Sabha Elections, resulted in substantial addition of around 40 lakh with voter’s new voters in the age group of 18-19 contributing more than 50% of this addition. Special attention was paid in enrolling electors belonging to Third Gender, PVTGs and PwDs.

Special focus was given to Polling stations. Various activities including rationalization of Polling Stations, de-clustering, shifting polling stations from temporary to permanent structures, creating new Polling Stations wherever necessary and establishing polling stations in High rise building, Housing Societies and Slums were taken up. Rationalisation and creating new polling stations were aimed at limiting the number voters per Polling Station. De-clustering was done at more than 5800 locations; More than 1100 polling stations were established in in High rise buildings and Housing Societies; More than 200 polling stations were established in Slums across the State.

‘Know Your Polling Station’ QR code enabled campaign was undertaken apart from distributing Voter Information Slips to almost all voters. In Mumbai, colour codes were given to the different polling station in the same polling station location and this colour code was visible in the Voter Information slip also. This enabled the voters to easily identify their polling station in a location with many polling stations.

Special attention was given to Assured Minimum Facilities at each polling stations like drinking water, ramp, seating arrangement in queue, parking facilities, etc. Under effective supervision of election machinery, urban and rural local bodies came out with flying colours in providing these facilities. This is very well appreciated by all the voters throughout the state. Voting was made quick by adhering to the rule of allowing four persons at time in the polling station instead of one which happened at many places during Lok Sabha Elections. Identification of voters, inking and voting were undertaken simultaneously to different voters. NSS volunteers & NCC cadets contributed to queue and traffic management apart from assisting elderly people and PWDs.

Mumbai, being the capital of the state and one of the biggest and important urban conglomeration in the world was naturally in focus for ECI as some challenges were identified during Parliamentary Elections. After proper analysis and with full understanding of present administrative scenario, ECI took an important decision to notify the Municipal Commissioner of BMC as District Election Officer for both the districts- Mumbai City & Mumbai Suburban. Further senior officers like Additional Municipal Commissioners were nominated as Additional District Election Officers in addition to district collectors entrusting the responsibility of one Parliamentary Constituency (six Assembly Constituencies) to each one of them. The initiative proved successful and the results could be seen immediately.

ECI ensured strict implementation of Model Code of Conduct by transferring of key officials of Revenue, Police and other departments related to election to ensure strictly adherence to prescribed norms. The field machinery was always on alert mode while handling challenging situations related to Law and Order.

## Counting Arrangements

There are 288 Counting Centres for counting of votes of 288 ACs and 01 Counting Centre for counting of votes of 16-Nanded PC. 288 Counting Observers have been appointed for 288 ACs and 02 Observers are appointed for 16-Nanded PC. Counting of Votes at all Counting Centres will start at 08.00 am on 23.11.2024. During this process, Counting of Postal Ballot papers will start at 8:00 am followed by counting on Votes on EVMs at 08:30 am.

The Contesting Candidates/Political Parties have been informed in writing regarding location of Counting Centres. Sealed strong rooms are opened in front of observers and available candidates or their agents and EVMs are brought to the counting centre. All the proceedings in the counting centre in covered by CCTV. Three-layer security arrangement at all Counting Centres as per guidelines of Election Commission of India is ensured.

Forms-12,12D and Postal Ballot papers for Polling Staff/Police Staff on election duty as well as Voters in Essential Services were dispatched through Post Offices. To enable better voting as well to ensure secrecy of votes voting through facilitation centres was introduced recently by ECI.

In the current elections, to make the process easier, with the help of NIC an online system was developed to transfer Form 12 and 12 D instantly. To exchange empty postal ballot papers for approved Forms as well as for exchanging polled ballot papers, clearing houses were run at District, Divisional and State Level. More than 68000 Senior Citizens above 85+ and more than 12000 PwDs exercised their franchise through for Home Voting. More than 36000 voters from essential service have casted their vote by postal ballot. 466823 postal ballots were issued to voters on election duty and around 116000 ETPBS were accepted for service voters.

The number of Postal Ballot papers is relatively high in all ACs. Therefore, a total 1732 tables for Postal Ballot counting and 592 tables for ETPBMS scanning (pre-counting) have been set up at 288 Counting Centres.

Transparency is ensured through continuous media briefing and dissemination of important statistics as well as developments both online and traditional modes.

0000